आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक ०३ ऑगस्ट २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. विदर्भातील उद्योगवाढीच्या सर्व संभावनांचा कॉन्फिडरेशन ऑफ इंडिया इंडस्ट्री-सीआयआयच्या विदर्भ विभागीय कार्यालयाने अभ्यास करावा; केंद्रीय मंत्री नितीन गडकरी.

2. महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार येत्या ५ ऑगस्ट रोजी मुंबईत प्रदान करण्यात येणार.

3. जनतेला उत्तम प्रशासनाचा प्रत्यय यावा यासाठी लवकरच धोरणात्मक बदल- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन.

4. भारत-इंग्लंड ५ व्या कसोटी क्रिकेट सामन्यात चौथ्या दिवस अखेर इंग्लंड पुढं विजयासाठी ३७४ धावांचे लक्ष्य.

<u>सीआयआय- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी</u>

कुठल्याही उद्योगाच्या विकासासाठी पाणी, ऊर्जा, वाहतूक आणि संचार या गोष्टी महत्त्वाच्या असून विदर्भातील खनिज, कोळसा, वनउत्पादन, पर्यटन, कापूस उद्योग या सर्व उद्योगवाढीच्या संभावनांचा कॉन्फिडरेशन ऑफ इंडिया इंडस्ट्रीच्या विदर्भात होत असलेल्या विभागीय कार्यालयाने अभ्यास करून या क्षेत्रातील कमकुवत दुवे ओळखावे आणि त्यांना बलस्थानामध्ये रूपांतरित करावे, यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य केंद्र आणि राज्य सरकार करेल, अशी ग्वाही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूरमध्ये दिली. नागपुरात भारतीय उद्योग महासंघाच्या (सीआयआय) नवीन विदर्भ विभागीय कार्यालयाचे उद्घाटन आज त्यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. विभागीय कार्यालयाचा उद्घाटन कार्यक्रम आणि त्यासोबतच्या “इंडिया@१००: चार्टिंग विदर्भाज जरनी टू डेवलप्ड इंडिया’ या शीर्षकाखाली आयोजित परिषदेत गडकरी यांनी सांगितले की विदर्भाच्या जवळ असणाऱ्या आंध्र प्रदेशमधील बंदरे ही मालवाहतूक खर्चामध्ये कपात करू शकतात.

*विजयवाड़ा टु नागपुर केवल 545 किलोमीटर और उन्होंने अभी 12 पोर्ट्स डेवलॅप कर रहे है। वो विशाखापट्नम मैं जब शिपिंग मंत्री था तब मैंने मेरे समय अच्छा डेवलॅप हुआ तो मैं सोच रहा था की अगर ये पोर्ट डेवलॅप हो जाएंगे तो मुंबई जाने के लिए जितना डिस्टेंस लगता है, उसके आधे डिस्टेंस में हम समुद्र में पहुँच पाएंगे। दूसरी इम्पोर्टेन्ट चीज़ है की इन पोर्ट में ड्राफ्ट भी अच्छा है। मुंबई में ट्रैफिक कन्जेस्चन जैसा है, वैसे पोर्ट में भी कन्जेस्चन है,*

*जो पोर्ट्स है वो अगर नागपुर से नजदीक होते है, विदर्भ से नजदीक होते है, तो हम लॉजिस्टिक कॉस्ट कम कर सकेंगे । क्योंकि आने वाले समय में लॉजिस्टिक कॉस्ट बहुत महत्वपूर्ण है।*

नागपुरातील भारतीय उद्योग महासंघाच्या (सीआयआय) नवीन विदर्भ विभागीय कार्यालय हे लक्ष्मीनगर येथे स्थित असून, ही संघटना सल्लागार प्रक्रियांद्वारे उद्योग आणि सरकार दोघांशी भागीदारी करून, उद्योग वाढीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याचे काम करते.

<u>मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन</u>

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचं काम वेगाने होत असून लौकरच या दोन शहरातलं अंतर केवळ २ तास ७ मिनिटांवर येईल, असं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. गुजरातमधे भावनगर रेल्वे स्थानकात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.भावनगर ते अयोध्या या साप्ताहिक गाडीला वैष्णव यांनी हिरवा झेंडा दाखवला. पुण्याहून मध्यप्रदेशातल्या रिवाकडे जाणाऱ्या तसंच जबलपूर ते रायपूर या गाडीचं उद्घाटनही त्यांनी दूरस्थ पद्धतीनं केलं. गेल्या अकरा वर्षात ३४ हजार किलोमीटरचे नवे रेल्वेमार्ग तयार झाले असून भारतीय रेल्वेचं मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे, असं ते यावेळी म्हणाले. रेवा-पुणे (प्रारंभिक सुपरफास्ट विशेष रेल्वे गाडी ६ ऑगस्ट नियमितपणे धावेल आणि पुणे-रेवा एक्सप्रेस ही गाडी ७ ऑगस्ट पासून नियमितपणे धावेल. या नवीन रेल्वे सेवा सुरू झाल्यामुळे, प्रवाशांना जबलपूर, बालाघाट, गोंदिया, राजनांदगाव, रायपूर आणि पुणे दरम्यान थेट, सुलभ आणि सोयीस्कर रेल्वे सेवा मिळेल. शिक्षण, व्यवसाय, वैद्यकीय आणि रोजगारासाठी प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी या सेवा विशेषतः फायदेशीर ठरतील, असे वैष्णव यांनी सांगितलं.

*बहुत ही गौरव की बात है कि माननीय प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदीजी के बड़े विज़न के साथ रेलवे में एक बड़ा परिवर्तन हो रहा है। नई पटरियां बन रही है, नई तरह की ट्रेन्स आ रही है, ट्रैन को साफ रखना, स्टेशन को साफ रखना, नए स्टेशन बनाना, कई तरह के काम हाथ में लिए गए और आज बहुत खुशी की बात है कि भावनगर से अयोध्या धाम को जोड़ने वाली नई ट्रैन आज चालू हुई है। मध्य प्रदेश में दो गाड़ियां रवाना हुई हैं, एक रीवा से पुणे और दूसरी जबलपुर से रायपुर।*

देशातल्या तेराशे रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास प्रकल्प हा जगातला सर्वात मोठा प्रकल्प असल्याचंही त्यांनी सांगितलं.

## महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार

महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार येत्या मंगळवारी ५ ऑगस्ट रोजी मुंबईत प्रदान करण्यात येणार आहेत. गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार गझलगायक भीमराव पांचाळे यांना तसंच, चित्रपती व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार अभिनेता आणि दिग्दर्शक महेश मांजरेकर यांना प्रदान करण्यात येईल. चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार अभिनेत्री मुक्ता बर्वे यांना देण्यात येणार आहे. राज कपूर जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांना, तर राजकपूर विशेष योगदान पुरस्कार अभिनेत्री काजोल यांना दिला जाणार आहे. यंदापासून छत्रपती शिवाजी महाराज महावारसा पुरस्कार देण्याची घोषणा शासनानं केली असून सांस्कृतिक वारसा आणि इतिहास जपणाऱ्या कार्यकर्त्यांना या पुरस्कारानं सन्मानित करण्यात येईल.

## आयएएम नागपूर परिषद

जनतेला उत्तम प्रशासनाचा प्रत्यय यावा, यासाठी प्रशासकीय यंत्रणेत बदल व्हावे ही अनेकांची भावना होती. ती लक्षात घेऊन एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आपण राज्य स्तरावरील सर्व जिहाधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची परिषद घेऊन केलेल्या मंथनातून सहा समित्यांची स्थापना केली गेली. या समित्यांनी अत्यंत कमी कालावधीत आवश्यक त्या बदलासह अभ्यासपूर्ण शिफारसी केल्या आहेत. या शिफारसीनुसार तत्काळ शासन निर्णय निर्गमित करून जनतेला अभिप्रेत असलेल्या उत्तम प्रशासनाचा प्रत्यय जनतेला मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल व्यक्त केला. नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्था अर्थात आयएएम येथे दोन दिवसीय परिषदेच्या अध्यक्षीय मार्गदर्शनात ते बोलत होते. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. महसूल अधिकाऱ्यांचा विशेषत: विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांचा कामकाजाचा वेळ मंत्र्यांचे प्रोटोकॉल सांभाळण्यातच जातो. याविषयी चिंता व्यक्त करत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घोषणा केली की, यापुढे आपला प्रोटोकॉल सांभाळण्यासाठी विभागीय आयुक्त अथवा जिल्हाधिकाऱ्यांनी येऊ नये. या वेळेचा सदुपयोग त्यांनी जनतेच्या कामासाठी करावा, असे त्यांनी सांगितले. यावेळी आकांक्षित जिल्हा आणि तालुका अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.

## बळवंत वानखेडे

अमरावतीच्या चिखलदरा तालुक्यातील नागापूर येथील आदिवासी आश्रमशाळेत काही दिवसांपूर्वी पाण्याच्या टाकीची भिंत कोसळून एका विद्यार्थिनीचा मृत्यू झाला आणि तीन विद्यार्थिनी गंभीर जखमी झाल्या. या घटनेनंतर अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे आणि काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी रुग्णालयात जाऊन जखमी विद्यार्थिनींची प्रकृती जाणून घेतली आणि त्यांच्या कुटुंबियांशी संवाद साधला. भेटीदरम्यान दोन्ही नेत्यांनी उपस्थित शिक्षकांकडून संपूर्ण घटनाक्रमाची माहिती घेतली. त्यांनी डॉ.रावत यांना मुलींच्या आरोग्याबाबत आणि प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी आवश्यक ती सर्व काळजी घेण्याच्या सूचना दिल्या. नेत्यांनी विद्यार्थिनींच्या नातेवाईकांशी बोलताना या प्रकरणात सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासनही दिले.

## क्रिकेट

भारत आणि इंग्लंड यांच्यातील सुरू असलेल्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील शेवटचा सामना लंडनमधील ओव्हल येथे खेळला जात आहे. भारताने इंग्लंडसमोर विजयासाठी ३७४ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. सामन्याच्या आजच्या चौथ्या दिवशी इंग्लंडचा दुसरा डाव सुरू असून असून अखेरचं वृत्त हाती आलं, तेव्हा इंग्लंडच्या ३ गडी बाद १६४ धावा झाल्या असून ज्यो रूट २३ धावांवर तर हॅरी ब्रूक ३८ धावांवर खेळत आहेत. भारतातर्फे मोहमद सिराजने २ गडी बाद केले. त्याआधी भारताचा दुसरा डाव ३९६ धावांवर संपला. इंग्लंडचा पहिला डाव २४७ धावांवर संपला होता, तर भारताने पहिल्या डावात २२४ धावा केल्या होत्या. या मालिकेत इंग्लंडकडे २-१ अशी आघाडी आहे.

## हवामान

महाराष्ट्रात मागील काही दिवसांपासून पावसाचा जोर ओसरलेला असून, बहुतांश भागांत केवळ हलक्या सरींची नोंद होत आहे. हवामान विभागानुसार, सध्या राज्यात मुसळधार पावसाची शक्यता कमी असली तरी विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये पुढील ३ ते ४ दिवसांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता असून, हवामान विभागाने या भागांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. नागपूरमध्ये काल शनिवारी कमाल तापमान ३४ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले. हवामान विभागाच्या माहितीनुसार, ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यापासून राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

धमकी

नागपुरात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या घरात बॉम्ब ठेवले असून बॉम्बने घर उडविण्यात येईल, अशा धमकीचे फोन नागपूर पोलिसांच्या कंट्रोल रूमला सकाळी 9 वाजता आल्यावर पोलिस यंत्रणा सक्रिय झाली. पोलिसांनी गडकरी यांचा घराचा बॉम्ब शोधक नाशक पथकाच्या सहाय्याने घराच्या आत आणि परिसरात कसून चौकशी केल्यानंतर ही धमकी म्हणजे फेक कॉल होते हे स्पष्ट झाले. पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास केल्यानंतर या तुळशीबाग रोड, महाल येथील विष्णू राऊत या आरोपीला अटक केली आहे. या धमकीच्या पार्श्वभूमीवर गडकरी यांची सुरक्षा वाढविण्यात आली आहे.

*****